CMYK

बीड । गुरूवार
१३.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३३४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# पंकजा मुंडे-धस यांच्यात कलगीतुरा !

## एकमेकांविरोधात पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार



**मुंबई । प्रतिनिधी**

**भाजपचे आमदार सुरेश धस हे जाहीर टीका–टिप्पणी करीत असल्याने त्यांना समज देण्याची विनंती पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी भाजपचे वरिष्ठ नेते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना केली आहे. तर मीही पंकजा मुंडे यांची केंद्रीय नेतृत्वाकडे आणि फडणवीस व बावनकुळे यांच्याकडे लेखी तक्रार करणार असल्याचे प्रत्युत्तर धस यांनी दिले आहे. त्यामुळे भाजपमधील दोन ज्येष्ठ नेते व आमदारांमध्येच कलगीतुरा रंगला आहे.**

'विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यापासून गेले पाच–सहा महिने मी गप्प बसले होते. पण माझा उल्लेख करून धस हे वैयक्तिक टीका करीत आहेत. निवडणुकीत ७५ हजारांचे मताधिक्य घेऊन विजयी झाल्यावर लगेचच मी त्यांचा प्रचार केला नसल्याचा आरोप धस यांनी केला. हे चुकीचे आहे. मी जर प्रचार केला नसता, तर एवढे मताधिक्य घेऊन निवडून येता आले असते का ? मी भाजपच्या सर्व उमेदवारांचा प्रचार केला आहे. उलट मलाच लोकसभा निवडणुकीत आधीपेक्षा कमी मताधिक्य मिळाले. पण धस यांनी निवडणुकीत माझे काम केले नाही, असा आरोप मी केला नाही, असेही, मुंडे म्हणाल्या. लोकसभा निवडणुकीत अनेकांनी माझे काम केले नव्हते. पण मी गप्प राहून परिस्थितीवर मात केली. धस यांची टीकाटिप्पणी पक्षाचे वरिष्ठ नेते व पक्षाच्या शिस्तीला मान्य होणारी नाही. त्यामुळे त्यांना समज देण्याची विनंती मी पक्षश्रेष्ठींना केली असल्याचे मुंडे यांनी पत्रकारांना सांगितले. बीडमधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मी तेवत ठेवले. देशमुख हा भाजपचा मतदान केंद्रप्रमुख होता. त्याच्या आरोपींना फाशीची शिक्षा होईपर्यंत मी शांत बसणार नाही, असे सुरेश धस यांनी नमूद केले.

# ज्याच्या दर्शनाला गेला त्यानेच टाकली पत्नीवर वाईट नजर

## म्हणाला 'तुझी मुलगी माझी...', भक्ताने अखेर...; जालन्यात एकच खळबळ

**जालना । प्रतिनिधी**

जालन्यातील भोकरदन तालुक्यातील वालसा वडाळा गावातील ज्ञानेश्वर आहेर या ३० वर्षीय विवाहित व्यक्तीने लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दहा दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेनंतर आत्महत्या करणाऱ्या आहेर यांच्या पत्नी अंजना आहेर यांनी भोकरदन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करत एका भोंदूबाबाच्या त्रासाला कंटाळून पतीने आत्महत्या केल्याचा आरोप केला होता.

या तक्रारीच्या आधारे भोकरदन पोलिसांनी भोंदूबाबाला अटक करत त्याची चौकशी केली. यावेळी अनेक धक्कादायक खुलासे झाले असून, एकच खळबळ उडाली आहे.

ज्ञानेश्वर आहेर हे पत्नी अंजना आहेर आणि मुलींसोबत बुलढाणा जिल्ह्यातील चामनगाव या ठिकाणी दर्शनासाठी गेले असता आरोपी भोंदूबाबाशी त्यांची ओळख झाली होती. या ओळखीतून भोंदूबाबाने मोबाईल नंबर आणि गावाचा पत्ता घेतला होता. त्याची अंजना ज्ञानेश्वर आहेर हिच्यावर वाईट नजर होती. यातून त्याने फोन करणं आणि चिठ्ठी पाठवत त्रास देण्यास सुरुवात केली. ज्ञानेश्वर याला फोन करून आणि ▶▶ उर्वरित पान २ वर



# धनंजय देशमुखांचा साडू गोत्यात

## व्हायरल व्हिडिओनंतर पोलीस ॲक्शन मोडमध्ये, गुन्हा दाखल होणार

**बीड । प्रतिनिधी**




जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या केल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. देशमुख कुटुंबीयांच्या पाठीशी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र आणि माणुसकी उभी राहिली. एखाद्या व्यक्तीचा असा अमानुष छळ करुन राक्षसी कृत्य केल्याविरुद्ध आजही सर्वत्र संताप पाहायला मिळत आहे. मात्र, या घटनेनंतर आता बीडमधील राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांचे किंवा त्यांच्या निकटवर्तीयांचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. या व्हिडिओमध्येही अशाच प्रकारे मारहाण करण्यात येत असल्याचे दिसत आहे. त्यातच, आता संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्या साडूचा देखील एका व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, तो एका व्यक्तीला शेतात जबर मारहाण करत असल्याचं दिसत आहे. त्यामुळे, बीडमधील सर्वच घटनांच राजकारण होत असून व्हायरल व्हिडिओची वेगळीच प्रथा बीड जिल्ह्यात सुरू झाली आहे. तर, या व्हिडिओवरून पोलीसही कारवाईला पुढे आले आहेत. आता, धनंजय देशमुख यांचे साडू दादासाहेब खिंडकर यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात येत आहेत. बीडचे एसपी नवनीत कावत यांनी याबाबत माहिती दिली. पिंपळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी मधुसूदन हे आहेत, ते चौकशी करत आहेत. प्राथमिक माहितीनुसार दादासाहेब खिंडकर चा मारहाणीचा व्हिडिओ एक वर्षांपूर्वीचा आहे. खिंडकर विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू. बीडच्या पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कावत त्यांची माहिती दिली. गुन्हा दाखल करण्यासाठी फिर्यादीची गरज असते, न्यायालयीन प्रक्रियेत तो महत्त्वाचा भाग असतो, असेही कावत यांनी म्हटले.

### काय आहे प्रकरण, कोण आहेत खिंडकर

बीड जिल्ह्यात धनंजय देशमुखांच्या साडूचा म्हणजेच दादासाहेब खिंडकरांचा एक जूना व्हिडिओ समाजमाध्यमावर ▶▶ उर्वरित पान २ वर




# संतोष देशमुख हत्या प्रकरण; न्यायालयातील पहिल्या सुनावणीस वाल्मीक कराड हात जोडून उभा

**केज । प्रतिनिधी**



राज्यभर गाजलेल्या मस्साजोग ( ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची पहिली सुनावणी केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या मकोका अतिजलद न्यायालयात बुधवारी सकाळी झाली. सुरक्षेच्या करणास्तव व्हिडिओ कॉन्फर्सिंगद्वारे आरोपींना न्यायालयासमोर ओळख परेडसाठी हजर ▶▶ उर्वरित पान २ वर

# ना.अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

- आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली जिल्हावासीयांकडून अपेक्षा
- बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले

**मुंबई । प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा ( अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ ) थेट प्रक्षेपण

यावेळेस ना.अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल. अशी अपेक्षा संपूर्ण जिल्ह्यावासीयांकडून आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न सभागृहात मांडले.

मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न व कामे सभागृहात मांडली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यावेळेस ना.अजित दादा पवार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याला ना.अजितदादांकडून अपेक्षा आहेत. ना.अजितदादांच्या पुढाकारातून येत्या पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास बाराम तीसारखा होईल अशी लोकभावना जिल्हावासीयांची आहे. अशा शब्दांत आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांकडे जिल्ह्याच्या विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केली.

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हद्दपार करायची असेल तर, तरूणांना रोजगार देऊन गुन्हेगारी पासून परावृत्त करावे लागेल. त्यासाठी बीड येथे असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा ना.अजित पवारांकडे पाठपुरावा सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वीच ▶▶ उर्वरित पान २ वर

# नाफेड शासकीय हमीभावाने तूर विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू: सभापती रमजान तांबोळी

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मतदार संघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय तुर खरेदी केंद्राला मंजुरी मिळाली असून सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणी सुरू झाली असून ऑनलाईन नोंदणी दि.२४ मार्च पर्यंत करून घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेड अंतर्गत दि महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन यांचे सेवा सहकारी सोसायटी लि. जामगाव ता.आष्टी या शासकीय हमीभाव तूर खरेदी ▶▶ उर्वरित पान २ वर




दैनिक
# मराठवाडा पत्र
**संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे (मो. ९८२२१५२९५५)**

## ४ वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

# चौथा वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई–मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई–मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

CMYK

# 'होळी' सणाचे पावित्र्य राखा !

दुष्प्रवृत्ती आणि अयोग्य विचार यांची होळी करून सत्प्रवृत्ती जोपासण्याचा संकल्प करण्याचा सण म्हणजे होळी. भारतात स्थानपरत्वे हा सण साजरा करण्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न असल्याच्या पाहायला मिळतात. होळी साजरी करण्यामागील कथाही राज्यानुसार आणि चालीरीतीनुसार वेगवेगळ्या सांगितल्या जातात. काही प्रदेशात होळीला अधिक महत्व दिले जाते, तर काही ठिकाणी होळीनंतर येणाऱ्या रंगपंचमीला. गेल्या काही वर्षांत शहरासारख्या ठिकाणी होळी सणामध्ये गैरप्रकारांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला पाहायला मिळतो ज्यामुळे या सणाचे पावित्र्य कुठेतरी कमी होऊ लागले आहे.

होळीचे निमित्त करून आठवडाभर आधीपासूनच इमारतींच्या गच्चीवरुन, रेल्वे गाड्या, बसेसवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिक पिशव्या फेकून मारल्या जातात. यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन मुलींसह नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना खासकरून लक्ष्य केले जाते. नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त युवावर्गाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर महिलांच्या सन्मानार्थ स्टेटस आणि पोस्ट लावल्या होत्या तोच युवावर्ग आज होळीचे निमित्त साधून महिलांवर पाण्याने भरलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या फेकताना दिसत आहे. आज आपण येणा-जाणाऱ्या महिलांवर ज्याप्रमाणे पाण्याच्या पिशव्या फेकून मारत आहोत, कुठेतरी आपल्या आईला, बहिणीला आणि प्रियजनांनाही अशा प्रकारच्या त्रासाचा सामना करावा लागत असेल याचा विचार ही मंडळी केव्हा करणार ? दरवर्षी केवळ पाण्याने भरलेले फुगे



आणि पिशव्या मारण्यामुळे कितीतरी अपघात घडतात, कितीतरी जणांना आपले डोळे गमवावे लागतात, तर कित्येकांना कायम स्वरूपी अपंगत्व येते. मागील ५-६ वर्षांपासून होळीच्या निमित्ताने फुग्यांना पर्याय म्हणून पातळ प्लास्टिक पिशव्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत. धूलिवंदनाच्या दिवशी दुपारीच या प्लास्टिक पिशव्यांचा खच रस्त्यावर साचलेला पाहायला मिळतो. हवेसोबत उडत जाऊन या पिशव्या नाल्यांत आणि गटारांत साचतात. २६ जुलै २००५ या दिवशी मुंबईत महाप्रलय आला होता ज्याला मुख्यत्वे कारणीभूत प्लास्टिक पिशव्याच होत्या. वर्षभर प्लास्टिक निर्मूलनासाठी प्रयत्न करणारे पालिका प्रशासन होळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर कायदेशीर कारवाई करताना कुठे दिसत नाही. काही ठिकाणी परस्परांतील वैमनस्य काढण्यासाठी इतरांच्या वस्तू चोरून त्या होळीत जाळल्या जातात. होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाती. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात. या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे. होळीसारख्या पवित्र सणामध्ये शिरलेल्या गैरप्रकारामुळे या दिवसांत अनेक जण घराबाहेर पडणे टाळू लागले आहेत. सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो: मात्र होळीसारख्या पवित्र सणाला आलेले ओंगळवाणे स्वरूप पाहता आपणच आपल्या धर्माची अवहेलना करत आहोत हे हिंदू केव्हा जाणणार आहेत ?

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# होळीच्या पवित्र अग्नीत व्हावे अवगुणांचे दहन, नांदो सुख, समृद्धी, शांती करु आनंदाचे वहन !





होळी हा भारतातील एक महत्त्वाचा आणि आनंददायक सण आहे. हा सण फाल्गुन महिन्यात पौर्णिमेला साजरा केला जातो. होळी हा सण केवळ रंगांचा उत्सव नसून तो प्रेम, बंधुत्व आणि स्नेहाचे प्रतीक आहे. या दिवशी समाजातील सर्व स्तरातील लोक आपले भेदभाव विसरून एकत्र येतात आणि उत्साहाने हा सण साजरा करतात. हा सण वसंत ऋतूचे स्वागत करणारा असून निसर्गात नवीन पालवी फुटण्याची आणि आनंद पसरवण्याची वेळ असते.

होळी हा सण प्राचीन काळापासून साजरा केला जात आहे. या सणाच्या मागे अनेक धार्मिक आणि ऐतिहासिक कथा आहेत. त्यापैकी सर्वात प्रसिद्ध कथा हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद यांची आहे. हिरण्यकश्यपू हा एक अहंकारी राक्षस राजा होता. त्याचा मुलगा प्रल्हाद हा विष्णूचा भक्त होता. हिरण्यकश्यपूला हे मान्य नव्हते आणि त्याने प्रल्हादाला मारण्याचा अनेक प्रयत्न केला. अखेरीस त्याने आपल्या बहिणीला, होलिकाला, प्रल्हादाला अग्नित टाकून मारण्यास सांगितले. होलिकेला वरदान होते की ती अग्नीमध्ये जळणार नाही, परंतु प्रल्हादाच्या भक्तीच्या शक्तीमुळे ती स्वतः जळून खाक झाली आणि प्रल्हाद वाचला. या घटनेच्या स्मरणार्थ होळी साजरी केली जाते आणि या दिवशी होळीका दहन केले जाते. होळीचा उत्सव दोन दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी होळीला दहन केले जाते. लोक संध्याकाळी एकत्र येऊन लाकडे, गवत, वाळलेले पानं यांचा ढीग रचतात आणि त्याला आग लावतात. हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. या वेळी लोक पारंपरिक गाणी गातात आणि नृत्य करतात. दुसऱ्या दिवशी रंगपंचमी असते, जिथे लोक एकमेकांवर रंग उधळतात आणि गुलाल लावतात. या दिवशी लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, जाती-धर्माचे भेद विसरून सगळे एकत्र येतात आणि रंग खेळतात. मित्र, नातेवाईक आणि शेजारी एकमेकांना शुभेच्छा देतात आणि गोडधोड पदार्थांचा आस्वाद घेतात.

होळीच्या दिवशी विविध प्रकारचे पारंपरिक पदार्थ बनवले जातात. या दिवशी विशेषतः गूळ-गव्हाचे पुरणपोळी, गुझिया, दहीवडा, भांग ठंडाई आणि अनेक मिठाया बनवल्या जातात. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे लोक आपआपल्या घरी बनवलेल्या गोडधोड पदार्थांचा एकमेकांना स्वाद देतात आणि स्नेहभाव वाढवतात. आजकाल होळी खेळताना रासायनिक रंगांचा जास्त वापर केला जातो, ज्यामुळे त्वचेचे आणि डोळ्यांचे नुकसान होते. याशिवाय मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. म्हणूनच पर्यावरणपूरक होळी साजरी करणे आवश्यक आहे. नैसर्गिक रंगांचा वापर करावा, पाण्याची बचत करावी आणि होळीका दहनसाठी जास्त लाकडे न वापरता इको-फ्रेंडली पर्याय शोधावेत. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि पुढील पिढ्यांसाठी हा सण टिकून राहील.

होळी हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो प्रेम, बंधुत्व आणि आनंदाचा संदेश देतो. हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो आणि लोकांना एकत्र आणतो. बदलत्या काळानुसार आपण पर्यावरणपूरक होळी साजरी करावी आणि तिच्या सामाजिक महत्त्वाला जपावे. सणाचा आनंद घेताना निसर्गाचे रक्षण करणेही आपली जबाबदारी आहे.

होळी हा रंगांचा उत्सव आहे, तो प्रेम आणि आनंदाचा संदेश देतो. चला, आपणही एकमेकांवर प्रेमाचा रंग उधळूया आणि सणाचा आनंद द्विगुणित करूया !

**– पत्रकार संभाजी लांडे**

पान १ वरून पुढे...

## ज्याच्या दर्शनाला गेला...

चिठ्या पाठवून तुझी मुलगी ईश्वरी ही माझीच आहे. ईश्वरी मला पाहीजे नाहीतर मी तुमच्यावर ५ से १० लाखाचा मानहाणीचा दावा दाखल करेल अशी धमकी तो देत होता. या त्रासाला कंटाळून आणि बदनामी होईल या भीतीने ज्ञानेश्वर यांनी आत्महत्या केल्याचं उघड झालं. यानंतर पोलिसांनी आरोपी भोंदूबाबा गणेश लोखंडे याची चौकशी केली असता त्याला गुप्त धनासाठी नरबळी देण्यासाठी पायाळू मुलगी हवी होती असं उघड झालं. त्यासाठी त्याने ईश्वरी हिची मागणी केली होती. पती पत्नीनं यासाठी नकार दिल्याने या बाबाने एका वकिलामार्फत पती पत्नीला सहा लाखांची नोटीस बजावली होती. या भोंदू बाबाने नरबळीसाठी खड्डा करून ठेवल्याची धक्कादायक बाब पोलिस चौकशीत समोर आली आहे. त्यामुळे तो महिलेला ब्लॅकमेल करत होता. त्यातूनच घाबरलेल्या ज्ञानेश्वरने आत्महत्या केल्याचंही तपासात उघड झाल्याने भोकरदन पोलिसांनी आरोपी भोंदू बाबा गणेश लोखंडे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. या प्रकरणी आरोपीसोबत आणखी कोण होत का याचाही पोलीस तपास करत आहेत.

## संतोष देशमुख...

करण्यात आले. यावेळी आरोपींच्या वकिलांनी जबाबचे पूर्ण कागदपत्रे मिळाले नाहीत, ते देण्यात यावे अशी मागणी केली. यानंतर आता या प्रकरणाची पुढील सुनावणी दि. २६ मार्च रोजी होणार असल्याचा निर्णय न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांनी दिला. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी अपहरणं करुन त्यांची अतिशय क्रूरपणे हत्या

पान १ वरून पुढे...

करण्यात आली होती. या प्रकारणाचा तपास सीआयडी व एसआयटीने करुन ८० दिवसांत बीडच्या मकोका न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. तेथून हे दोषारोपपत्र केज येथील न्यायालयात वर्ग करण्यात आले. त्यानंतर आज, बुधवारी सकाळी ११:३० वाजता या प्रकरणाशी संबंधित सरपंच हत्या, खंडणी व अ‍ॅट्रॉसिटी या तीनही गुन्ह्यांच्या पहिल्या सुनावणीला सुरुवात झाली. प्रथमतः सर्व आरोपींना व्हिडिओ कॉन्फर्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर करुन ओळख परेड घेण्यात आली. त्यानंतर जिल्हा व अप्पर सत्र न्यायालयाच्या अतिजलद व मकोका न्यायालयात न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांच्या समोर सुनावणीला सुरुवात झाली. सुनावणी सुरू असताना न्यायालयाच्या बाहेर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यामुळे केज न्यायालयाबाहेर व परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिली.

वाल्मिक कराडने हात जोडले..- या प्रकरणातील सर्व आरोपीना ओळख परेडसाठी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे न्यायाल्यासमोर हजर करण्यात आले. यावेळी या प्रकरणातील मुख्यसूत्रधार वाल्मिक कराड हा हात जोडून उभा असल्याचे दिसून आले. दरम्यान, सरपंच हत्या प्रकरणातील फिर्यादी शिवराज देशमुख यांना यावेळी न्यायालयाने तुम्हाला दोषारोप पत्राची प्रत मिळाली आहे का? दाखल केलेल्या दोषारोप पत्रावर तुम्ही समाधानी आहात का? असे विचारले असता देशमुख यांनी सकारात्मक उत्तरे दिली...

## धनंजय देशमुखांचा...

प्रचंड व्हायरल झाला. त्यात धनंजय देशमुखांचे साडू दादासाहेब खिंडकर एका व्यक्तीला बेदम मारहाण करताना दिसत आहेत. हा

पान १ वरून पुढे...

व्हिडिओ जुना असून तो वाद कधीच मिटला असल्याचं त्यांच्याकडून सांगण्यात आलं आहे. मात्र, दादासाहेब खिंडकरांवर घरफोडी, पैसे उकळून फसवणूक अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचेही आता समोर आले आहे. कोण आहे दादा खिंडकर? - बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावचा सरपंच पती दादासाहेब खिंडकर आहे. - धनंजय देशमुख यांचा तो साडू आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळावा यासाठी तो सक्रिय सहभागी होता.. - दादासाहेब खिंडकर याच्यावर अनेक ठिकाणी गंभीर गुन्हे आहेत. - गेल्या दहा वर्षापासून राजकारणात सक्रिय आहे. -राष्ट्रवादी काँग्रेसचा तो कार्यकर्ता आहे. - सामान्य शेतकरी कुटुंबातील दादा खिंडकर यांच्या गेल्या दहा वर्षांपासून ग्रामपंचायत ताब्यात आहे. - ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये अनेक वाद आणि भांडण समोर आले होती.

## ना.अजितदादा...

बीड एमआयडीसीचा प्रस्ताव घेऊन आ.संदीप क्षीरसागर ना.अजितदादांना भेटले होते. त्यावर ना.अजितदादांनी विभागाला निर्देश दिले होते. त्यानंतर बीड येथे उपलब्ध असलेल्या २५० एकर जागेचा सर्वे काही दिवसांपूर्वीच झाला आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी येथे उपलब्ध आहेत. तसेच मोठ्या उद्योजकांनाही भेटलो असून त्यांनीही याठिकाणी उद्योग उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बीड एमआयडीसीच्या विकासासाठी निधी देऊन बळ द्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी केली. बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अतिमहत्वाच्या असलेल्या विविध प्रस्तावित कामांना निधी आणि मंजुरी देण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली.

पान १ वरून पुढे...

## नाफेड शासकीय...

केंद्रांस मंजुरी मिळाली आहे. या हमीभाव केंद्रात ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी सातबारा व ८ अ मूळ प्रत,आधारकार्ड,बँक पासबुक (चालु खाते द्यावे,जनधन खाते देऊ नये),ऑनलाइन पिकपेरा नोंद असणे आवश्यक इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.तसेच लवकरच प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी कमी दराने तुरीची विक्री न करण्याचे आवाहन केले आहे.

पान ४ वरून पुढे...

## पत्रकार नवनाथ आडे...

संध्याकाळचा वेळ असल्याने तक्रारदाराने सदरील घडलेल्या प्रकाराची सबब माहिती पत्रकार नवनाथ आडे यांना दिली. माहिती मिळताच तात्काळ पत्रकार नवनाथ आडे यांनी संबंधित पाचोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना घटनेची माहिती दिली. त्यांनी लगेच शासकीय गाडी सोबत पोलीस उपनिरीक्षक व पोलीस कर्मचारीही आणि तक्रारदार यांना गाडीत बसवून व घटनास्थळी पाठवले पोलिसांची गाडी त्याठिकाणी आल्यावर सदर आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी तक्रारदाराला पोलीस ठाण्यात आणून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सातत्याने वाढत चाललेली गुन्हेगारी यावर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. आरोपी मार्फत झालेल्या अन्यायाची भावना समजून घेत पत्रकार आणि पोलीस बांधव यांनी वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करून तक्रारदाराची तक्रार पाचोड पोलीस स्टेशन येथे दाखल करून घेण्यात आली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरुवार, दि.१३ मार्च २०२५ पान ४

## जगद्गुरु श्री संत तुकोबाराय यांच्या त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव बीज सोहळ्यानिमित्त, त्रिदिवसीय किर्तन



**बीड:** बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्त दि.०९/३/२०२५ रोजी संगीतमय श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा चालू आहे .या पावन पर्वावर त्रिदिवसीय किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे या मध्ये गुरुवार दिनांक १३/३/२५ रोजी ह.भ.प.श्री.भरत महाराज साळुंके ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठा जिल्हा जालना यांचे रात्री ९ते ११ कीर्तन सेवा होणार आहे. तसेच शनिवार दिनांक १४/३/२५ ला ह.भ.प. कु.तनया दिदी भडे खेड जी.पुणे दि.१५/३/२५शनिवारी ह भ प तुकाराम महाराज करडकर आळंदी देवाची यांचे हरिकिर्तन होईल.

## थोडक्यात

### महीला दिना निमीत्त मोफत नेत्र रोगनिदान शिबीर व दिव्यांगाना साहीत्य वाटप



**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील परडी माटेगाव येथे महिला दिनानिमित्त कानिफनाथ बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा ऐश्वर्याताई सोळंके यांच्या वतीने जयसिंहभैय्या सोळंके यांच्या मार्गदर्शना खाली सरपंच अँड माधव शेंडगे यांच्या नियोजना खाली मोफत नेत्र रोगनिदान मोतिबंदु शस्त्रक्रीया शिबीर,विनामुल्य औषध उपचार व दिव्यांगांना व्हील चेअरचे वाटप करण्यात आले या शिबीराचा पंचक्रोशितील गरजु रुग्नांनी या शिबीराचा लाभ घेतला. सविस्तर वृत्त असे की कानिफनाथ बहु ऊदेशीय संस्थेच्या वतीने बीड जिल्हा परीषदेचे मा सभापती जयसिंह भैय्या सोळंके यांच्या मार्ग दर्शना खाली रुग्न सेवा हीच इश्वर सेवा समजुन अनेक गोर गरीब अनाथ गरजु दिन दुबळ्यांची सेवा संस्थेच्या माध्यमातुन समाज सेवा केली जात आहे.यामध्ये महिलांची आरोग्य तपासनी व सर्व रोगनिदान शिबीर,वयोवृद्ध गरजु रुग्णांचे नेत्र तपासणी व मोतिबिंदु मोफत शस्त्रक्रीया शिबिर,आत्महत्या केलेल्या व आपघातात मयत झालेल्या अनाथ कुटुंबीयांना आधार देण्याचे काम या संस्थेच्या अध्यक्षा सौ ऐश्वर्याताई जयसिंह सोळके यांच्या मार्फत केले जाते.वडवणी तालुक्यातील परडी माटेगाव येथे महिला दिनाचे औचित्य साधून मंगळवार दि ११ रोजी महिलांचे आरोग्य तपासणी व नेत्र रोग निदान मोतीबिंदु शस्त्रक्रीया शिबिर घेण्यात आले.या शिबीरात २३७ रुग्नांची तपासनी करण्यात आली.यामध्ये मोतीबिंदु शस्त्रक्रिया नऊ रुग्नांची करण्यात येणार आहे.आपंग गरजु दिव्यांगांना ५ व्हील चेअरचे वाटप करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ता अध्यक्ष बजरंग साबळे,जि प सदस्य औदुंबर काका सावंत,कृषी ऊत्पन्न बाजार समीतीचे संचालक सचिन लंगडे, मा सरपंच विश्वासराव आगे,रोहयोचे मा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर सुरवसे,मा सरपंच लखन महागोविंद,युवा नेते सोमेश्वर टीळे,सरपंच अँड माधव शेंडगे,चेअरमन रुक्मांगद शेंडगे, रविराज शेंडगे यांच्या सह गावातील नागरीक युवक मोठ्या प्रमाणात उपस्थीत होते.

### रक्त तपासणी विभाग वेळेपूर्वीच कुलूप बंद

#### उपजिल्हा रुग्णालयात रुग्णाची गैरसोय



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णालयातील रक्त तपासणी विभाग हा वेळेपूर्वीच बंद होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक झळ सोसावी लागत आहे त्यामुळे रुग्ण आणि नातेवाईकांमधून रुग्णालयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.बीड-जालना राष्ट्रीय महामार्गावर उपजिल्हा रुग्णालय हे गरजू रुग्णांसाठी मोठा आधार आहे मात्र रुग्णालयाच्या कारभाराबाबत तसेच सुविधा या सध्या रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे. त्याबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे उपजिल्हा रुग्णातील कर्मचाऱ्यांच्या येण्याच्या आणि जाण्याच्या वेळा निश्चित नसल्याने नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे उपजिल्हा रुग्णालयातील नागरिकांच्या सेवेसाठी असलेले रुग्णालय हे सकाळी वेळेत सुरू होत जरी असले तरी दुपारनंतर वेळेवर येत नसल्याची चर्चा सध्या सर्व परिसरात सुरू आहे परंतु बंद होण्याच्या पूर्वीच अनेक सेवा बंद केल्या जात असल्याची नागरिकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे. रक्त तपासणी लॅब ही सातत्याने दररोज सकाळी उघडली जाते परंतु दुपारनंतर या विभागांची लॅब बंद असल्याचे सांगितले जाते रुग्णालयाचे अधीक्षक हे कर्तव्यदक्ष असून रुग्णालयातील कर्मचारी वर्ग त्यांना मानावे असे सहकार्य करीत नसल्याची चर्चा आहे त्यामुळे अनेक रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होतं आहे बाह्य रुग्ण विभागात रुग्णांची रांग असताना देखील वेळेच्या आधी या ठिकाणी रक्त तपासणीसाठी असणारी प्रयोगशाळा देखील वेळेच्या आधीच बंद करून कर्मचारी कुलूप लावून निघून जात असल्याचा आरोप यावेळी रुग्णांनी केला रुग्णांना मात्र बाहेरून रक्त तपासणीसाठी खिशाला आर्थिक झळ सोसावी लागत आहे.

### कृषी केंद्र चालकाची बॅग चोरी; व्यापाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे मालक अण्णाभाऊ साठे चौकात कामासाठी थांबले होते. त्यांच्या कार मध्ये ठेवलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून या विरुद्ध कारवाई करण्याचे निवेदन व्यापाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहे. जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे केदारनाथ शहीर हे शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात (दि.१) मार्च रोजी रात्री कामासाठी गाडी बाजूला लावून थांबले असता त्यांच्या कार मध्ये ३ लाख रुपये असलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. अशा प्रकारे होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अशा चोरट्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा तसेच केदारनाथ शहीर यांचो चोरी केली रक्कम याचा तपास करावा या मागणीचे निवेदन बीड पोलीस अधीक्षकांना व्यापाऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.

# वयोवृद्ध आजबे दांमपत्याची फरफट पुढारी नातवानेच केली फसवणूक

## गोड बोलून जमिन विकली परंतु पैसे देण्यास टाळाटाळ , आम्हाला आता काम होत नाही आम्ही जगायचं कसं??

**बेलगाव । प्रतिनिधी**

दोन्ही मुले वारली.वयोवृद्ध आजबे दाम्पत्याच्या जमिनीची गाव पुढारी असणाऱ्या नातवाने ( मुलीच्या मुलाने) गोडबोलून विक्री करून आलेला पैसा स्वतः च्या खात्यावर जमा केला. आजोबांनी वारंवार नातवाला पैशाची मागणी करूनही गाव पुढारी नातवाने आज देतो, उद्या देतो म्हणत २ वर्षांपासून टाळाटाळ करत आहे. मुलीच्या मुलांकडे जमिन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगाही सांभाळ करत नाही. त्यामुळे वयोवृद्ध आजबे दांमपत्य अत्यंत हलाखीच्या परीस्थीतुन जात असुन या वयात काही करता येत नाही,पोट भरायचे कसं?? असा प्रश्न पडला असुन आमची अडचण सोडवा अशी कैफियत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना मांडली. सिताराम संभाजी आजबे वय ९० वर्षे मुळचे राहणार ब्रम्हगाव ता.आष्टी जि.बीड. त्यांना २ मुले आणि ४ मुली. त्यांची त्याठिकाणी साडे ३ एक्कर जमिन होती. जमिनीच्या भांडणात भावकीच्या माणसांनी मोठा मुलगा ज्ञानेश्वर याचा खुन केला. दुसरा मुलगा उत्तम भावकीच्या भितीने आजोळी टाकळगव्हाण ता.गेवराई







याठिकाणी राहु लागला.६ वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांना ४ मुली असुन दोन मुली बीड तालुक्यातील बेलगाव आणि सोमनाथ वाडी या ठिकाणी तर दोन मुली पाटोदा तालुक्यातील मंगेवाडी आणि डोमरी ( रोहतवाडी) याठिकाणी दिलेल्या आहेत. ४ वर्षांपूर्वी सोमनाथवाडी येथील गाव पुढारी नातवाने गोड बोलून माझी साडे ३ एक्कर जमिन विकायला लावली. जमिन विकुन आलेले २० लाख रुपये स्वतः च्या खात्यावर टाकले. नंतर आम्ही पैसे मागितल्यावर आज देतो.उद्या देतो म्हणून टाळाटाळ केली. २ वर्षांपूर्वी टाकळगव्हाण येथील मुलाने आग्रह धरल्याने ६ लाख रुपये दिले. त्याचं नातवाने ट्रॅक्टर घेतले. लाख रूपये मध्यंतरी दवाखान्यासाठी दिले. मात्र २ वर्षांपासून उर्वरित १२ लाख रुपये द्यायला टाळाटाळ करत आहे. मला चालता येत नाही. टाकळगव्हाण येथुन ३००० रुपये गाडी भाडे करून. सोमनाथवाडीला यावं लागतं. अशा १० -१२ वेळा चकरा मारल्या आहेत. दोघांच्या नावाने दिलेले प्रत्येकी ५ लाख रूपयांचे चेक आहेत.पण बँक वाले म्हणतात खात्यात पैसेच नाहीत.द्यायचे कुठुन?? मुलीच्या मुलांकडे जमीन विकुन पैसे दिल्याने मुलाचा मुलगा आम्हाला सांभाळीत नाही. आम्हाला काम होत नाही, आम्ही जगायचं कसं ?? असा उद्विग्न सवाल सिताराम संभाजी आजबे यांनी करत आहेत.

# जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद ; गावकऱ्यांनो, पंचनामे करा - ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त





ॲड. अजित देशमुख यांनी केली आहे. यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत.

शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करावी. शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं. मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे. त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत. त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही. हे देखील दिसून येईल. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणार्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ॲड. देशमुख यांनी केली आहे.

### पत्रकार नवनाथ आडे यांच्या एका फोनवर पाचोड पोलीस प्रशासन एकवटले!

## गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पाचोड पोलीस प्रशासन सज्ज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील राजपिंपरी शिवारातील वाघदारा तांडा येथील एका सामान्य व्यक्तीची तक्रार पत्रकार नवनाथ आडे यांच्याकडे आली होती की, आम्हाला पाचोड पोलीस प्रशासनाची मदतीची गरज आहे. या अनुषंगाने पत्रकार नवनाथ आडे यांनी संबंधित असलेल्या पाचोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना एक फोन करताच सदरील तक्रारदाराला पोलीस प्रशासनाकडून तात्काळ लागेल तशी मदत मिळाली आहे.

पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कडीठाण तांडा येथे सदरील



तक्रार असलेले डिगांबर राठोड यांचा संबंधित नातेवाईकांसोबत काही कारणास्तव वाद निर्माण झाला होता. तक्रारदार हा गेवराई तालुक्यातील असल्याने त्याला स्थानिकच्या लोकांकडून धनकवले जात होते. विशेष म्हणजे

▶▶ उर्वरित पान २ वर

### कळसंबरमध्ये आपला परिवार वृद्धाश्रमातील वृद्धांना अन्नदान

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूरजवळील कळसंबर येथील आपला परिवार वृद्धाश्रमातील वृद्धांना उद्योजक प्रदीप ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त होळ (ता.केज) येथील धनराज लाटे मित्र मंडळाच्यावतीने सोमवारी अन्नदान करण्यात आले. धनराज लाटे मित्र मंडळाच्या पुढाकारातून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जातात. धनराज लाटे मित्र मंडळाच्या पुढाकारातून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# काळामारोती मंदिरत लघु रुद्राभिषेक व कलशारोहन उत्साहात महाप्रसादाचा भक्तांनी घेतला लाभ

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरातील प्रसिध्द काळा मारोती मंदीराचा कलशारोहण सोहळा तिन दिवस उत्साहात व विवीध कार्यक्रमांनी संपन्न झाला भाविक भक्त तिन ही दिवस मोठ्या संख्येने उपस्थीत होते. विधीवत पुणे हा सोहळा संपन्न झाला. धारूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी अयोध्यानगर भागात श्री काळा मारुती मंदीर आहे. हे मंदीर जुने व भक्तांची श्रध्देने या मंदीरात नेहमीच गर्दी असते मंदीराचे सुशोभीकरण साठी या मंदीराचे मानकरी गावस्कर परीवार व भक्तानी एकत्रित येऊन मंदीराचा तिन दिवशीय कलशारोहण सोहळा ठेवला होता तिन दिवस विवीध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पहील्या दिवशी श्री गणेश स्मरण,



शांती सुप्त व शोभायात्रा काढण्यात आली दुसरे दिवशी कुंडदेवता पुजन होम हवन आयोजीत केले होते तर कलशारोहन, श्री गणेश सुप्त व महाप्रसादाचे आयोजन केले होते या सोहळ्यात हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला मोठ्या उत्साहात विधीवत पारंपारीक पध्दतीने हा कलशारोहण सोहळा उत्साहात संपन्न झाला.







# माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करा

## माजलगाव पत्रकारांची पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे बीड जिल्ह्यात आगमन होताच गुटखा, वाळू माफिया, गुंड यांचे धाबे दणाणले गुटखा बंद झाला वाळूची अवैध तस्करी बंद झाली आणि गुंड लपून बसले मात्र माजलगाव तालुक्यातील मटका आजही चालूच आहेत या अवैध मटक्याच्या जुगारा मुळे अनेक गोरगरीब मजूर यांचे संसार उध्वस्त होत आहेत हे पाहून माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक कावत यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे .

बीड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसापासून अवैध धंदे वाढले होते गुंडगिरी वाढली होती या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी तरुण तडफदार पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना महाराष्ट्र सरकारने नियुक्त केले त्यांनीही आपली धडाडीची कारकीर्द दाखवत बीड जिल्ह्यातील गुटका किंग, वाळू किंग, तसेच गुडांचे आका यांच्यावर जरब निर्माण केली यामुळे कावतांची दहशत कुठेतरी फावत आहे याचे दर्शन बीड जिल्ह्याला झाले मात्र मटका जुगार राजरोसपणे माजलगाव शहरासह ग्रामीण भागात चालू आहे आपण एक रुपया लावला तर नव्वद रुपये मिळणार या आशेने मजुरी काम करणारे महिला पुरुष यामध्ये भरडले जात आहेत मटका तर लागतच नाही मात्र अशा खूप वाईट असते आज ना उद्या आपल्याला मटका लागेल या हेतूने रोजंदारी करणारे मजूर आपण दिवसभर केलेल्या कामाचे पूर्ण पैसे मटक्यावर लावत आहेत आणि दुसऱ्या दिवशी मटका न लागल्यामुळे गृहकलह करून संपूर्ण कुटुंब उपाशी झोपत आहे कावत साहेब मजुरीचे पैसे आम्हाला पुरतात मात्र माजलगाव तालुक्यातील मटका बंद व्हायला हवा अशी आरत हाक मजूर कुटुंबीयांच्या महिला पोलिसांसह, पत्रकारांना देत आहेत ही हाक ऐकून माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत ज्यांच्याकडे निवेदन देऊन माजलगाव शहरास ग्रामीण तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी करण्यात आली आहे याचे प्रतिलिपी निवेदन माजलगाव पोलीस ठाणे शहर, माजलगाव पोलीस ठाणे ग्रामीण यांना देण्यात आलेले आहे यावर तात्काळ कारवाई न झाल्यास तालुक्यातील जनतेच्या वतीने जनतेसह पत्रकार तीव्र आंदोलन करतील याची दक्षता पोलीस प्रशासनाने घ्यावी असा इशाराही देण्यात आलेला आहे .